# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 April 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १४ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०

****

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती देशभर उत्साहात साजरी
- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं कार्य सरकारच्या प्रेरणास्थानी– पंतप्रधानांचं प्रतिपादन
- एकसंघ भारताचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं चैत्यभूमी इथं अभिवादन
- न्याय प्रणाली जनकेंद्री आणि वैज्ञानिक बनवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नरत, केंद्रीय गृहमंत्र्यांची माहिती
- अग्निशमन दलातील आठ अग्निशमन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रपती पदक प्रदान

आणि

- मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांत पुढील दोन दिवसात अवकाळी पावसाची शक्यता

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळ इथं बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरीवंश, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह

केंद्रीय मंत्रिमंडळातल्या सदस्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरियाणातील हिसार येथील जाहीर सभेत बोलताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना या शब्दांत अभिवादन केले.

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधानांच्या हस्ते हरियाणात आज विविध विकासकामांचं लोकार्पण करण्यात आलं. यात हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेची सुरुवात, तसंच हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी यांचा समावेश आहे.

****

डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर, तसंच नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हजारो अनुयायी दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयी–सुविधेसाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन केलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक क्रांतीचे जनक होते. समानता प्रस्थापित करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आणि आधुनिक भारताचा पाया रचला, असं राज्यपाल यावेळी म्हणाले.

एकसंघ भारताचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला जातं, असं मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं. कुठल्याही परिस्थितीत संवैधानिक मूल्यांपासून दूर न होता, संविधानानुसारच संकल्प करण्याचं आवाहन त्यांनी केलं, ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

विधान भवन परिसरात विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या भडकल गेट इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विविध पक्ष आणि संघटनांच्या वतीनं अभिवादन करण्यात येत आहे. पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापीठातही व्याख्यान, रक्तदान शिबिर असे विविध कार्यक्रम होत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी अभिवादन केलं. तसंच `वाचन कट्टा` उपक्रमाचंही उद्घाटन केलं. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकित यांच्या हस्ते वेरूळ सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

****

नांदेडमध्ये जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केलं.

बीड शहरातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा इथून सकाळी अभिवादन रॅली काढण्यात आली.

जालना शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मस्तगड इथल्या डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला विविध पक्ष, संघटनांसह राजकीय पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केलं. या ठिकाणी रक्तदान शिबिर तसंच इतर सामाजिक उपक्रमांसह मिरवणूकीचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

परभणी जिल्हाधिकारी कार्यालय इथं पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, यांनी डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी भिखू संघाच्या वतीनं सामूहिक महावंदना घेण्यात आली तसंच पंचशील ध्वजारोहण समता दलाची आणि शहरातील सर्व धर्मीय दिव्यांग समाज बांधवांची अभिवादन रॅली काढण्यात आली.

****

रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी सामाजिक न्याय आणि विशेष साह्य विभागाच्या वतीनं डॉक्टर आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. याठिकाणी आंबेडकर यांचे भव्य-दिव्य स्मारक उभारलं जाईल अशी ग्वाही उद्योगमंत्री डॉक्टर उदय सामंत यांनी यावेळी दिली.

****

केंद्र सरकार देशात न्याय प्रणाली जनकेंद्री आणि वैज्ञानिक बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. शहा यांनी आज नवी दिल्ली इथं आयोजित अखिल भारतीय न्यायवैद्यक शिखर परिषदेला संबोधित केलं, त्याप्रसंगी ते बोलत होते. सरकार समयबद्ध रितीनं योग्य न्याय देण्याच्या दिशेनं प्रयत्नरत असल्याचं ते म्हणाले.

**बाईट – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

****

राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ आज मुंबईत पार पडला. राज्यातल्या अग्निशमन दलातील सेवेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या आठ अग्निशमन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आलं. मुंबई डॉकयार्ड इथं १९४४ रोजी झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी आणि जवानांच्या स्मरणार्थ हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस पाळला जातो.

****

नांदेड महानगरपालिका अग्निशमन विभागात आजपासून "अग्निशमन सेवा सप्ताह" पाळण्यात येत आहे. यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, यांच्या हस्ते शहीद स्मृतींना पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

****

फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला बेल्जियम पोलिसांनी अटक केली. पंजाब नॅशनल बँक कर्ज घोटाळा प्रकरणात ही अटक झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयची विनंती आणि मुंबईतल्या एका न्यायालयाकडून दोन अटक वॉरंटच्या आधारे बेल्जियम पोलिसांनी ही कारवाई केली. जानेवारी २०१८ मध्ये मेहुल चोकसी भारतातून फरार झाला होता.

****

'संवाद मराठवाड्याशी' या नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे उद्या नागरीकांशी वेबिनारद्वारे संवाद साधणार आहेत. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून ते

नागरीकांशी बोलणार असून, आठही जिल्ह्यातल्या नागरिकांनी यात सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

हवामान

मराठवाड्यासह राज्यात बहुतांश ठिकाणी पुढील दोन ते तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशिव इथं पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज असून या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथल्या श्री कांचनेश्वर देवस्थान इथं काल पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त भरवण्यात आलेल्या यात्रेतही भाविकांनी मोठी गर्दी केली असून आठवडाभर विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आज याठिकाणी कुस्तीची दंगल होणार आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ इथं लखनऊ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात सामना होणार आहे. सामन्याला सायंकाळी साडे सात वाजता सुरूवात होईल.

****

आज फ्लोरिडा इथं झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या धीरज बोम्मदेवराने रौप्य पदक पटकावलं. त्यानं आंद्रेस टॅमिनो मेडियलचा ६–४ असा पराभव केला.

****